पोलीस स्टेशन शिरपूर
कार्यालय दुरध्वनी क्र ०७२५४–२७४००३

# प्रेस नोट

**" चांडस शिवारातील अनोळखी व्यक्तीच्या खुनाचा पोलीस स्टेशन शिरपूर पोलीसांकडून ४ तासात उलगडा, ०५ आरोपी अटकेत,शिरपूर पोलीसांची उल्लेखनीय कामगिरी "**

——००——

दि.१०/२/२०२५ रोजी चांडस येथे मेहकर ते मालेगांव रोडचे बाजूला हॉटेल कृष्णाई चे अलीकडे हे पुरूष मरून पडलेला आहे.अशी माहीती प्राप्त झाल्या वरून ग्राम चांडस शिवारातील मेहकर ते मालेगांव रोडचे बाजूला असलेल्या ठिकाणी पोलीसांनी भेट देवून पाहणी केली असता सदर ठिकाणी एक अनोळखी पुरूष जखमी अवस्थेत मरण पावलेला दिसून आला. प्रथमदर्शनी मृतक याचे अंगावरील जखमां आणि स्थितीवरून तो घातपात असल्याचे वाटत असल्याने पोलीसांनी तपास पथके तयार करून तपासाची चक्रे फिरवली व लगेच तांत्रीक आणि आधूनीक पध्दतीने तपास करून मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला असता सदर मृतक इसम हा महेश रूपराव हाडे रा.गोहगांव,ता.रिसोड,जि.वाशिम असा असल्याचे समजले.त्यावरून मृतक याचे नातेवाईकांना माहीती देण्यात आली. मृतकाचे नातेवाईक व इतर पध्दतीने माहीती घेतली असता मृतक हा गोहगांव वरून मोटर सायकल ने चांडस येथे आल्याचे समजले व त्याचे कडे मोबाईल सुध्दा होता असे समजले वरून मृतक याचे मोटर सायकलचा शोध घेतला असता सदरचे मृतक याची मोटर सायकल ही ग्राम चांडस गावात मिळून आल्याने आणखी संशय बळावला.त्यानंतर गोपणीय माहीती व्दारे माहीती घेतली असता मृतक महेश रूपराव हाडे यांचे गोहगांव येथील महीले सोबत प्रेमसंबध असून ती महीला चांडस येथे आल्याने तो गोहगांव वरून तिला भेटण्याकरीता चांडस येथे आल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले अशा माहीती वरून जलदगतीने तपास सूरू करून काही तासातच घटनेचा उलगडा करून सदर प्रकरणातील एकूण ०५ संशयीत आरोपीतांना ताब्यात घेतले. सदर घटने बाबत मृतकचा भाउ संतोष रूपराव हाडे याने पोलीस स्टेशन शिरपूर येथे भावाचे खुनाबाबत रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशनला आरोपी संतोष मारोती मुठाळ व इतर यांचे विरूध्द कलम १०३,३(५) भारतीय न्याय संहीता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयाचे कारणावरून ताब्यात घेतलेल्या आरोपीतांना गुन्हयाचे तपासात अटक करून त्यांना विश्वासात घेवून विचारपूस केली असता त्यांनी गुन्हयाची कबूली देवून यातील मृतक याला गोहगांव वरून चांडस येथे यातील आरोपी महीलेने दि.९/२/२५ रोजी रात्री भेटायला बोलाविले मृतक हा चांडस येथे त्या महीलेच्या घरात जाताच महीलेच्या वडीलांनी त्याला पकडून ठेवले व मुलाला शेतातून घरी बोलाविले त्यानंतर त्या दोघांनी मिळून महेश हाडे याला थापडा बुक्यानी त्या ठिकाणी मारहाण करून त्याला त्यांचे मोटर सायकल वर बसवून शेतात नेले.त्या ठिकाणी संतोष मुठाळ याचे इतर साथीदार या सर्वांनी मिळून महेश रूपराव हाडे याला लाथा बुक्या,हाताचे खुंबे आणि काठीने बेदम मारहाण करून जिवाने ठार मारले नंतर आरोपींनी गुन्हा आपल्या अंगावर येवू नये म्हणून पुरावा नष्ट करण्याचे उददेशाने त्याचे प्रेत चांडस गांवा पासुन २ कि.मी. अंतराव नेवून फेकूण दिले तसेच मृतक याचे कडील मोबाईल सुध्दा पुरावा नष्ट करण्याचे उददेशाने लपवून ठेवला. गुन्हयाचे तपासात यातील मृतक महेश रूपराव हाडे याचा मोबाईल आणि गुन्हा करतांना आरोपींनी वापरलेली मोटर सायकल तसेच गुन्हा करतांना आरोपींनी वापरलेले हत्यार असे तपासात जप्त करण्यात आले आहे. नमूद आरोपीतांना मा.न्यायालय,मालेगांव येथे हजर केले असता मा न्यायालयाने आरोपीतांना दि.१३/२/२०२५ पावेतो पोलीस कोठडी दिलेली आहे. सदर प्रकरणाचा उलगडा करण्याची विशेष कामगीरी मा.पोलीस अधिक्षक श्री अनुज तारे,अपर पोलीस अधिक्षक श्रीमती लता फड, सहायक पोलीस अधिक्षक श्री नवदीप अग्रवाल,उप विभाग वाशिम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण, पोउपनि रविंद्र ताले,पोउपनि इमरान पठाण,मपोउपनि व्दारका अंभोरे,पोहेकॉ संदीप निखाडे, पोहेकॉ/गुरूदेव वानखेडे,नापोकॉ बालाजी महल्ले,पोकॉ सतीष चव्हाण,पोकॉ गणेश देशमूख,पोकॉ हरीहर गांवडे, पोकॉ/अमोल घायाळ,चालक ग्रेड पोउपनि मोहम्मद शाहीद,चालक पोकॉ/ खिल्लारे यांनी केली असून तपासात गुन्हयातील इतर आरोपी निष्पन्न करून आरोपी विरूध्द सखोल असे पुरावे गोळा करण्यात येत आहेत.सदर गुन्हयाचा तपास पो.नि.रामेश्वर चव्हाण हे करीत आहेत.

रामेश्वर जी. चव्हाण
पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन शिरपूर

Scanned with OKEN Scanner